# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 17/06/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग २ - रजा

क्रमांक :- सआली-5/प्रसुती रजा/2096,पुज्या/ 4742 /2020. यवतमाळ दिनांक : 17 JUN 2020

**आदेश**

**मपोना/2096,पुजा बन्सोड नेमणुक,** मोटार परिवहन विभाग यवतमाळ यांना म.ना.से. रजा नियम 1981 मधील नियम 74 व शासन निर्णय क्र. अरजा-1409/प्र.क्र.08, सेवा-6, दिनांक 24/08/2009 अन्वये त्यांना रजेवर सोडल्याचे दिनांकापासुन 180 दिवस प्रसुती रजा मंजुर करण्यात येत आहे.

**(मा.पो.अ.यांच्या आदेशान्वये)**

(सुशिला पवार)
(प्र.) कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधीक्षक यवतमाळ करिता

प्रति,
पोनि- मोटार परिवहन विभाग यवतमाळ /डिपीजी लिपीक यांना माहीतीस व योग्य कार्यवाही करीता.
प्रत,मपोना/2096,पुज्या बन्सोड नेमणुक- मोटार परिवहन विभाग यवतमाळ

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

क्र. पोअय/डीपी/३१बी/उपविपोअ तोटावार/पोमसं/तामील प्रत / 4945 /२०२०
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालय, एल.आय.सी. चौक यवतमाळ
दुरध्वनी क्रमांक:-०७२३२-२५६७०० फॅक्स क्रमांक:-०७२३२-२५६७१०
ई मेल आय डी :- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 17 JUN 2020

---

**महत्वाचे**

**संदर्भ :-** अवर सचिव, गृह विभाग महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. इएनक्यु २०२०/ प्र.क्र. १२३/पोल-२, दिनांक १७/०६/२०२०.

**विषय :-** **निलंबन आदेश तामील प्रत**
श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ.

--०००--

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, आ.लो.से. श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांचेविरुध्द उमरखेड येथे गु.र.न. ०१२६/२० भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याने त्यांना शासनाचे आदेश निर्गमीत दिनांकापासुन निलंबीत करण्यात आलेले आहे. सदर निलंबन आदेशाची मुळ प्रत आ.लो.से. श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांना अदा करण्यात येवुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करंण्यात यावी.

**( एम.राज कुमार )**
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

**श्री. विकास तोटावार,** उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ.

**मार्फत :-** पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ.

**प्रत :-** पोउपअधि(मुख्या)/उपविपोअ उमरखेड/अधिकारी वेतन लिपीक/अधिकारी आस्थापना लिपीक/राजपत्र लिपीक यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीस.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**आदेश क्र : इएनक्यु २०२०/प्र.क्र. १२३/पोल-२**

**दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,**

**हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक : १७ जुन, २०२०.**

**आदेश**

ज्याअर्थी, श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांचेविरुध्द उमरखेड येथे गु.र.नं. ०१२६/२०, भ्रष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर प्रकरण अन्वेषणाधीन आहे;

त्याअर्थी, आता उक्त श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ च्या पोटनियम (१) (क) च्या तरतुदीनुसार निलंबनाचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून निलंबित झाल्याचे मानण्यात येत आहे आणि ते पुढील आदेश काढले जाईपर्यंत निलंबीत राहतील.

आणखी असेही आदेश देण्यात येत आहेत की, जोपर्यंत हे आदेश अंमलात असतील तेवढ्या कालावधीसाठी श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांचे मुख्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे कार्यालय हे राहील. तसेच त्यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या पुर्वपरवानंगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

हे आदेश अस्तित्वात राहतील त्या कालावधीसाठी श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम-१९८१ च्या नियम- ६८ अन्वये निर्वाहभत्ता व त्यावरील इतर भत्ते देय राहतील.

याबाबत पुढे असेही आदेश देण्यात येत आहेत की, श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांनी निलंबन कालावधीमध्ये कोणतीही खाजगी नोकरी स्वीकारु नये किंवा कोणत्याही व्यापारात अथवा धंद्यात स्वतःला गुंतवू नये. तसेच त्यांनी त्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, नि

काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ६९ पोटनियम (४) अन्वये आवश्यक असलेले प्रमाणपत्र दिल्याखेरीज त्यांना निर्वाहभत्ता देण्यात येऊ नये. निलंबन कालावधीमध्ये त्यांनी खाजगी नोकरी स्विकारली अथवा कोणताही व्यापार किंवा धंदा केला तर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १६ चा भंग केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास ते पात्र ठरतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दिपक पोकळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. विकास तोटावार,
उप विभागीय पोलीस अधिकारी,
उमरखेड, जि. यवतमाळ.

(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत)

**प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित:-**

१. महासंचालक व पोलीस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (दोन जादा प्रतींसह).
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची एक प्रत श्री. विकास तोटावार, उप विभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड, जि. यवतमाळ यांचेवर त्वरीत बजावून दुसऱ्या प्रतीवर त्यांची दिनांकासहित पोच स्वाक्षरी घेऊन सदर प्रत खास दुतामार्फत शासनास सादर करावी
२. विषेश पोलीस महानिरिक्षक परि. अमरावती.
३. पोलीस अधीक्षक, यवतमाळ ग्रामीण.
४. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
५. अधिदान लेखा अधिकारी, यवतमाळ.
६. गृह विभाग,कार्यासन- पोल-१ अ, मंत्रालय, मुंबई,
७. निवड नस्ती / पोल-२.